ARTHA, Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख ८ सप्टेंबर, १९५४ | अंक ३५

## विविध माहिती

**उत्तर-प्रदेशाच्या उत्पन्नांत वाढ**—उत्तर-प्रदेश सरकारनें कालव्याच्या पाण्याच्या दरांत वाढ केली. त्यामुळें चालू सालीं सरकारचें उत्पन्न सुमारें २·७३ कोटी रुपयांनीं वाढेल असा अंदाज राज्य सरकारच्या पाटबंधाऱ्याच्या खात्यातर्फें करण्यांत आला आहे.

**पतौडीच्या नबाबांची मालमत्ता**—भारताचे एक सुप्रसिद्ध माजी क्रिकेटपटु पतौडीचे नबाब ह्यांच्या अहमदाबाद येथील मालमत्तेची विक्री करण्यांत येणार असल्याचें समजतें. त्यांच्या सौराष्ट्रांतील इतर मालमत्तेचीहि विल्हेवाट लावण्याचा हुकूम मध्यवर्ती सरकारकडून आला असल्याची बातमी आहे. विक्रीच्या पैशांतून सौराष्ट्र सरकारला १२ लाख रुपये मिळणार आहेत.

**रशिआला भारताची देणगी**—भारताचे मॉस्कोमधील वकील श्री. मेनन ह्यांनीं २० भारतीय चित्रकारांनीं रंगविलेलीं तैलचित्रें भारतातर्फें रशिआला देणगी म्हणून दिली. भारतीय लोकसत्ताक राज्यातर्फें आलेली भेट म्हणून रशिआच्या सांस्कृतिक खात्यातर्फें देणगीचा स्वीकार करण्यांत आला.

**आठ नवीं विमानें**—इंडिअन एअर-लाइन्स कॉर्पोरेशननें ब्रिटनकडून आठ नवीं विमानें घेण्याचें ठरविलें आहे. हीं विमानें लहान असून भारतामधील सर्व प्रमुख शहरें विमानमार्गानें जोडण्याच्या कॉर्पोरेशनच्या योजनेसाठी तीं मुद्दाम मागविण्यांत आलीं आहेत. प्रत्येक विमानाची किंमत सुमारें ६,००,००० रुपये असेल.

**स्विस सरकारची मदत**—भारताच्या वायव्य भागांतील व उत्तर पाकिस्तानमधील पुराच्या तडाख्यांत सांपडलेल्या लोकांच्या मदतीसाठी स्वित्झरलंडच्या सरकारनें ५७,००० रुपये मंजूर केले आहेत. ही रक्कम स्विस रेड-क्रॉसचे अधिकारी भारतीय व पाकिस्तानी सरकारी नोकरांच्या सल्लामसलतीनें वाटणार आहेत.

**बिहारचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम**—बिहार राज्य सरकारच्या विकास खात्यानें पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या प्रगतीचा आढावा घेणारा अहवाल तयार केला आहे. ह्या अहवालांत दिलेल्या माहितीवरून राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमावर सरकार २०० ते ३०० कोटी रुपये खर्च करणार असल्याचें समजतें.

**काश्मीरमधील सहकारी बँका**—जम्मू आणि काश्मीरमधील सहकारी बँकांनीं दिलेल्या कर्जाच्या रकमा कांहीं प्रमाणांत कमी करण्यांत येणार आहेत. हें शक्य व्हावें म्हणून काश्मीर सरकार सहकारी बँकांना १५,५६,००० रुपयांची मदत करणार आहे. सहकारी बँका आपल्या येणें असलेल्या कर्जावरील व्याजाची सूट देणार आहेत.

**कोल्हापूर जिल्ह्यांत नवे साखर कारखाने**—कोल्हापूर जिल्ह्यांत घोटवडे आणि कोडोली ह्या दोन ठिकाणीं साखरेचे कारखाने काढण्याच्या योजनांना मुंबई सरकारनें मान्यता दिली आहे. दोन्ही साखर-कारखाने सहकारी तत्त्वावर काढण्यांत येणार आहेत.

**ताजमहाल पहावयास कोण जातात?**—गेल्या वर्षीं २८,००० परदेशी प्रवाशांनीं आग्रा येथील ताजमहालाला भेट दिली. त्यांपैकी एक चतुर्थांश अमेरिकन होते. हिंदी प्रवाशांत बंगाली व पंजाबी लोक ज्यास्त होते. ताजमहाल पहावयास येणारांची संख्या वाढत चालली आहे.

**हातकंदिलांचें संरक्षण संपणार**—हातकंदिलांच्या दिव्यांना दिलेल्या संरक्षणाची मुदत ३१ डिसेंबर, १९५४ अखेर संपते. हरिकेन दिव्यांच्या धंद्यास आतां संरक्षणाची जरूरी उरलेली नाहीं, असा टारिफ कमिशनचा अभिप्राय होता, त्यास अनुसरून सरकारनें संरक्षण चालू न ठेवण्याचें जाहीर केलें आहे.

**हैद्राबाद राज्याचे लंडनमधील बँकांत ४ लक्ष पौंड**—बार्कलेज बँक आणि वेस्टमिन्स्टर बँक ह्या दोन ब्रिटिश बँकांत हैद्राबाद राज्याचे ४,००,००० पौंड आहेत. ही रक्कम आतां लंडन येथील हिंदी हायकमिशनरच्या नांवानें त्या बँकांतून आहे. पूर्वींच्या निजाम सरकारनें यंत्रसामुग्रीची खरेदी, राज्याचे ग्रेटब्रिटनमधील विद्यार्थी, इत्यादींच्या खर्चासाठी लंडनमधील बँकांत ठेवली होती.

**जपानमध्यें दररोज ५४ आत्महत्या व ८ खून**—जपानमध्यें दररोज सरासरीनें ५४ लोक आत्महत्या करतात, असा जपानी सरकारी खात्याचा अंदाज आहे. जानेवारी ते मे, १९५४ मधील आत्महत्यांच्या आकड्यांवरून हा निष्कर्ष काढण्यांत आला आहे. स्वित्झरलंड, डेन्मार्क व ऑस्ट्रिया येथील आत्महत्यांचें प्रमाण ह्याहिपेक्षा अधिक आहे. जपानमध्यें दररोज आठ जणांचे खून होतात.

**उत्तर-प्रदेशांतील मिशनरी**—उत्तर-प्रदेश राज्यांत ५६५ परकीय मिशनरी सध्यां काम करीत आहेत, ह्या संख्येंत राष्ट्रकुलांतील मिशनरींची संख्या धरण्यांत आली नाहीं, अशी माहिती राज्य-सरकारच्या गृहमंत्र्यांनीं विधिमंडळांत सांगितली.

**रोटरी इंटर-नॅशनलचा सुवर्ण-महोत्सव**—जबलपूर येथील रोटरी इंटरनॅशनल ह्या संस्थेचा सुवर्ण-महोत्सव साजरा करण्याची तयारी करण्यांत येत आहे. करमणुकीचे कार्यक्रम करून १०,००० रुपये जमविण्यांत येणार आहेत. जमलेल्या रकमेचा उपयोग जबलपूर येथील व्हिक्टोरिआ हॉस्पिटलमधील सोयी वाढविण्यासाठी करण्यांत येणार आहे.

# CONFERENCE OF BANKERS IN MAHARASHTRA

Under the joint auspices of the Deccan Banks' Association and the Poona Banking Association, we propose to hold a **Conference** ( Social meeting ) of all the **Bankers in Maharashtra** on Saturday and Sunday, the 2nd and 3rd of October, 1954 in Poona. This will give a good opportunity of developing social contacts between bankers in this region and for a free discussion of common problems facing them all. It is, therefore, our humble request to all the bankers to make it convenient to attend the conference and give the benefit of their knowledge and experience to their colleagues.

It is proposed that Hon. Mr. **B. S. Hiray,** Revenue Minister, Govt. of Bombay should inaugurate the conference Shri **V. P. Varde,** Hon. Managing Director, The Bombay State Co-op. Bank Ltd. and Chairman, The Bank of Maharashtra Ltd., has agreed to preside over and guide the deliberations of the conference. Special arrangements will be made for sight-seeing of important places round about Poona. Educative films on subjects of Banking, Accountancy and Commercial Establishments will be shown.

On this occasion one Souvenir "**Banks in Maharashtra**" will be published in English giving complete details of the present position of banking in Maharashtra, including Joint Stock and Co-operative. This book will be a valuable reference book for bankers.

Shri **S. V. Kale,** Editor "Artha", Poona, will edit the same.

We expect hearty co-operation from the Bankers, for mutual benefit and for the progress of banking in this region. They should make it a point to attend the conference. Their suggestions are solicited.

**K. P. Joshi** — *Chairman.*
**M. V. Shingre,** — *( Hon. Secretary. )*

The Deccan Banks' Association.

**C. V. Jog,** ( *The Bank of Maharashtra Ltd.* )
**N. N. Kshirsagar,** (*The Bharat Industrial Bank Ltd.*)
**D. N. Gandekar,** ( *The New Citizen Bank of India Ltd.* )

( *Hon. Secretary.* )
Executive Committee
The Poona Banking Association.

**नेपाळला भारताची मदत**—नेपाळमधील पुराच्या तडाख्यांत सापडलेल्या लोकांना मदत म्हणून भारतीय सरकार ५०,००० रुपये देणार आहे. सदर रकमेपैकी २५,००० रुपये वैद्यकीय मदतीसाठी खर्च करण्यांत येणार आहेत. नेपाळमधील तराई विभागांत पुरानें फार नुकसान झालें आहे. आर्थिक व वैद्यकीय साह्य देण्याविषयीं चर्चा करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेचा एक प्रतिनिधि लवकरच नेपाळला जाणार आहे.

**लंडन शहरांत चहा महागणार**—ब्रिटनमधील चहाच्या किंमती वाढणार असल्याचा इषारा गृहिणींना देण्यांत आला आहे. दर पौंडामागें ४ ते ८ पेन्सनीं भाव वाढण्याचा संभव आहे. चालू वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत चहाचे भाव दोनदां वाढलेले आहेत. भारतांत आलेल्या पुरामुळें ब्रिटनला चहा पाठविण्यास उशीर होत आहे. त्यामुळें ग्राहकांना टंचाईच्या किंमती द्याव्या लागत आहेत.

**रेल्वेच्या नोकरांचें साह्य**—भारताच्या राष्ट्रीय-योजना-कर्जाचे ७ लाख रुपयांचे रोखे आतांपर्यंत रेल्वेच्या नोकरवर्गानें खरेदी केले आहेत. सगळ्यांत अधिक म्हणजे २,६४,००० रुपयांचे रोखे सेंट्रल रेल्वेच्या नोकरांनीं घेतले आहेत. ह्या रेल्वेच्या खालोखाल १,२३,००० रुपयांचे रोखे नॉर्दर्न रेल्वेच्या नोकरांनीं घेतले आहेत.

---


**सातारा जिल्हा को. ऑ. लँड मॉर्गेज बँक लि. कराड**

## भागीदारांस नोटीस

बँकेच्या भागीदारांची एकोणिसावी वार्षिक साधारण सभा शनिवार ता. १८-९-५४ रोजीं दुपारीं ४ वाजतां बँकेच्या सांगली ऑफीसमध्यें भरणार आहे. सदर सभेंत सन १९५३-५४ चा अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक मंजूर करणें; नियमाप्रमाणें डायरेक्टर्सची निवडणूक जाहीर करणें; ऑडिटर्सची नेमणूक व त्यांचें वेतन ठरविणें; वगैरे कामें केलीं जातील. तरी सदरप्रसंगीं बँकेच्या सर्व सभासदांनीं वेळेवर सभेस हजर रहावें अशी विनंती आहे.

कराड २२-८-५४ — निलकंठराव आण्णापा कल्याणी, चेअरमन.

---

**फक्त बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सभासदांकरितां**

## नोटीस

बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. ची वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक २६ सप्टेंबर १९५४ रोजीं दुपारीं ४ वाजतां बार्शी येथें बँकेच्या साने मेमोरिअल हॉलमध्यें भरणार आहे.

सदर सभेंत प्रतिवर्षाप्रमाणें वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटापत्रक मंजूर करणें, चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडणें, लोकल ऑडिटर्स यांची नेमणूक करून वेतन ठरविणें वगैरे कामें होतील.

तसेंच सन १९५४-५५ सालाकरितां मे. बोर्ड ऑफ डायरेक्टर्समधील रिकाम्या झालेल्या जागांकरितां डायरेक्टर्स निवडणेकरितां मतदान सदर दिवशीं सकाळीं ८ ते १२ वाजेपर्यंत होणार आहे.

तरी सर्व सभासदांनीं सभेस व मतदानास अवश्य उपस्थित रहावें अशी विनंति आहे.

बार्शी दिनांक २१-८-५४ — मा. वि. विश्वरूपे, चेअरमन, बार्शी सेंट्रल को. बँक लि. बार्शी.

# अर्थ

बुधवार, ता. ८ सप्टेंबर, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## नवा इंडेक्स नंबर तयार होत आहे

### १९५२-५३ = १०० हा आधार

मालाच्या घाऊक किंमतींमधील चढउतार दर्शिविणाऱ्या सध्यांच्या इंडेक्स नंबर ऐवजीं नवा इंडेक्स नंबर भारत सरकार तयार करीत आहे. तो १९५४-५५ हें आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी प्रसिद्ध केला जाईल. असें समजतें.

ऑगस्ट १९३९ अखेरच्या वर्षीं चालू असलेल्या घाऊक किंमतीस १०० हा आकडा देऊन, त्या आधारावर त्यानंतरच्या काळांतील किंमती दर्शविण्याचें काम सध्यांचा इंडेक्स नंबर करतो. मे, १९५४ अखेरचा इंडेक्स नंबर ३९६·१ इतका होता, ह्याचा अर्थ ऑगस्ट १९३९ अखेरच्या वर्षीं जिनसांची घाऊक किंमत १०० होती, ती मे, १९५४ अखेर ३९६·१ ह्या प्रमाणांत इतकी झाली म्हणजे १०० : ३९६·१ ती झाली. महागाईचें स्वरूप ह्या इंडेक्स नंबरावरून दिसून येतें. हा इंडेक्स नंबर तयार करतांना अन्नपदार्थ, औद्योगिक कच्चा माल, अर्थ-पक्का माल आणि तयार माल ह्यांच्या घाऊक किंमतींचा विचार केला जातो व त्यांपैकी प्रत्येक जिनसास त्याच्या एकूण जिनसांतील स्थानाप्रमाणें इंडेक्स नंबरांत भार दिला जातो. उदाहरणार्थ, अन्नपदार्थांत धान्यास डाळीच्या मानानें विशेष महत्त्व आहे. डाळीच्या किंमतींतील वाढीपेक्षा धान्याच्या किंमतींमधील वाढ अधिक जिव्हाळ्याची आहे. औद्योगिक कच्च्या मालांत कपास व लोकर ह्यांचे धागे महत्त्वाचे आहेत; तयार मालांत कपास कापड आपल्याला ज्यास्त महत्त्वाचें असतें. भारतांतील वेगवेगळ्या केंद्रांतील वेगवेगळ्या जिनसांचे घाऊक बाजारभाव मागवून इंडेक्स नंबर तयार करण्यांत येतात. आतां नवीन तयार करण्यांत येत असलेल्या इंडेक्स नंबरचा पाया १९५२-५३=१०० असा धरण्यांत येणार आहे व सध्यांपेक्षा बऱ्याच अधिक केंद्रांतील किंमतींचा त्यासाठीं उपयोग करण्यांत येणार आहे.

परराष्ट्रीय व्यापारांत ज्या मालास स्थान आहे, अशांना १९३९ च्या इंडेक्समध्यें विशेष भार दिलेला आहे, अशी त्याचेवर टीका केली जाते. आतां तयार करण्यांत येणाऱ्या इंडेक्समध्यें ही चूक दुरुस्त करण्यांत येईल व त्यामुळें इंडेक्स नंबर अधिक वस्तुस्थितिनिदर्शक होईल. घाऊक मालाच्या किंमतींचा इंडेक्स नंबर हा आर्थिक धोरण ठरविण्यास उपयोगी पडणारा बॅरॉमीटर समजाला जातो. युद्धपूर्व किंमतींच्या पातळीस पुनः कधींतरी किंमती पुनः येतील, ही आशा १९३९ ला पाया समजून केलेल्या इंडेक्समुळें शिल्लक रहाते; आतां युद्धोत्तर, भारताच्या फाळणीनंतरच्या १९५२-५३ सालास पाया समजून केलेल्या इंडेक्समुळें तो गैरसमज दूर होईल. युद्धपूर्व किंमतींच्या पातळीस आतां केवळ ऐतिहासिक महत्त्व ठरलेलें आहे. म्हणूनच, हा नवा इंडेक्स तयार करण्यांत येत आहे. १९५२-५३=१०० ह्या हिशेबानें चालू वर्षाचा इंडेक्स नंबर ९६ ते १०० ह्यांच्या दरम्यान येईल, अशी अपेक्षा आहे. घाऊक किंमतींच्या इंडेक्सप्रमाणेंच रहाणीच्या खर्चाच्या मानाचा इंडेक्सहि सुधारण्यांत येणार आहे.

---

### विकास योजना कर्ज: किती व्यक्तींनीं किती रक्कम दिली ?

२१ ऑगस्ट अखेर विकास योजना कर्जाचे द्वारां सरकारला १३१·२८ कोटी रुपये मिळाले आहेत. त्यापैकीं, मुंबई राज्यानें ९८·३ कोटी रुपये दिले आहेत. ह्या कर्ज उभारणीस कोणी कसा हातभार लावला, हें खालीं दिलें आहे:—

| | | |
|---|---|---|
| ५,००० रु. पर्यंत | ५५,००० व्यक्ती; | ४·५ कोटी रु. |
| ५ ते २५ हजार रु. | ४,२५० व्यक्ती; | ५·४ कोटी रु. |
| २५ ह. ते १ लक्ष रु. | १,७०० व्यक्ती; | १० कोटी रु. |
| १ लक्ष रु. चे वर | ६५५ व्यक्ती; | ११० कोटी रु. |

राज्य सरकारांनीं स्वतःचीं कर्जें स्वतः उभारलीं असतीं, तर त्यांना २५·५ कोटी रु. चें कर्ज मिळूं शकलें असतें, असा रिझर्व्ह बँकेचा अभिप्राय आहे. म्हणून, एकूण कर्ज उभारणीपैकीं २५·५ कोटी रु. राज्य सरकारांना दिले जातील व बाकीचे मध्यवर्ती सरकार स्वतः वापरील.

---

### कोणत्या राज्यांत किती कर्ज मिळालें ?

| राज्य | कर्जाची रक्कम ( कोटी रु. ) |
|---|---|
| मुंबई | ९८·३ |
| प. बंगाल | ७·१ |
| मद्रास | ७·१ |
| पंजाब | ४·५ |
| आंध्र | ३·८ |
| दिल्ली | २·७ |
| सौराष्ट्र व कच्छ | १·४ |
| बिहार | ०·८ |
| संयुक्त प्रांत | १·९ |
| म्हैसूर | ०·८ |
| मध्यभारत | ४·३ |
| त्रावणकोर-कोचीन | ०·७ |
| ओरिसा | ०·२ |
| हैद्राबाद | ·०३ |
| पेप्सु | ·०४ |
| राजस्थान | ०·१ |
| मध्यप्रदेश | ०·७ |
| आसाम | ०·०३ |
| अजमीर | ०·०४ |
| हिमाचल प्रदेश | ०·०१ |
| भोपाळ | ०·०३ |
| एकूण | १३१·२८ |

### व्यापारी स्पर्धेचा काळ जवळ आला काय ?

कोरिआंतील युद्ध स्थगित झाल्यापासून जगांत शांतता स्थिर होण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं. त्यानंतर जिनीव्हा परिषदेंत इंडो–चीनमधील युद्ध थांबविण्यांतहि यश आलें. रणांगणावरील स्पर्धा बंद झाली असली तरी व्यापारी क्षेत्रांत ती जोरानें चालू होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. प. युरोप आणि सो. रशिआ ह्यांच्या दरम्यान शक्य असणारा व्यापार अमेरिकेच्या राजकीय धोरणामुळें जवळ जवळ बंदच पडला होता. कारण, युद्धाला उपयोगी पडणाऱ्या मालाची निर्यात रशिआला करण्यास अमेरिकेचा विरोध होता. अशा मालाची मली मोठी यादीच अमेरिकन सरकारनें तयार केली होती आणि त्या यादींपैकी कोणताहि माल आपली मदत घेणाऱ्या राष्ट्रानें रशिआला पाठवतां कामा नये असा अमेरिकेचा निर्बंध होता. पण आतां ह्या धोरणांत बदल होणार किंवा झाला असें दिसतें. रशिआनें ब्रिटिश कारखान्यांकडे मोठ्या प्रमाणावर मालाची मागणी केलेली आहे. पूर्व–युरोपांतील देशांचें गिऱ्हाईक अशा तऱ्हेनें फक्त प. युरोपांतील देशांनाच मिळावें हें अमेरिकन कारखानदारांना सुपूं लागलेलें दिसतें. आतां अमेरिकन सरकारनें निर्बंध घातलेल्या मालाची यादी १,००३ वस्तूंवरून अवघ्या २०० वस्तूंवर आणून ठेवली आहे असें समजतें. पूर्व–युरोपांतील देश आणि रशिआ ह्यांच्याकडून खनिजें घेऊन त्यांच्या मोबदल्यांत अमेरिका भारी यंत्रसामुग्री त्यांना देण्याचा विचार करीत आहे. पूर्व–युरोपच्या बाजारपेठेंत आतां ब्रिटन, प. जर्मनी आणि अमेरिका ह्यांची कारखानदारी–स्पर्धा सुरू होणार असा रंग दिसूं लागला आहे. सो. रशिआवर स्वारी करण्याचे मनसुबे सोडून अमेरिका आतां ' नांदा व नांदूं द्या ' ह्या धोरणाकडे वळत चालली आहे, असा निष्कर्ष राजकीय निरीक्षक वरील माहितीवरून काढत आहेत.

### भारत व तिबेट ह्यांच्यामधील व्यापार

भारताचे व्यापार–मंत्री श्री. डी. पी. करमरकर ह्यांनीं भारत आणि तिबेट ह्यांच्यामधील व्यापारासंबंधीं कांहीं माहिती आणि आंकडे नुकतेच लोकसभेला सादर केले. श्री. करमरकर ह्यांनीं दिलेल्या माहितीप्रमाणें १९५०–५१ सालाच्या मानानें उभयतां देशांतील व्यापारांत घट झालेली दिसून येते. व्यापार-मंत्र्यांनीं दिलेल्या आंकडेवारींत प. तिबेटशीं होणाऱ्या व्यापाराचा समावेश करण्यांत आलेला नाहीं. १९५० ते १९५४ पर्यंतच्या व्यापाराचा आढावा घेतांना असें आढळून आलें कीं, १९५०–५१ सालीं तिबेटहून भारतांत आलेल्या मालाची किंमत ३,३०,००,००० रुपये होती. १९५१–५२ सालीं आयात झालेल्या मालाची किंमत ८१,००,००० रुपये भरली आणि १९५२–५३ सालच्या आयातीची किंमत ७१,००,००० रुपयेच झाली. १९५३–५४ सालीं १,००,००,००० रुपये किंमतीचा माल तिबेटकडून आयात करण्यांत आला. उलटपक्षीं भारतानें तिबेटला धाडलेल्या मालाची किंमत सालवार पुढील प्रमाणें आहे.

| साल | मालाची किंमत रु. |
|---|---|
| १९५०–५१ | २,१२,००,००० |
| १९५१–५२ | ९५,००,००० |
| १९५२–५३ | २,२७,००,००० |
| १९५३–५४ | २,०१,००,००० |

भारत आणि तिबेट ह्यांच्या दरम्यान व्यापारी करार झालेला आहे. उभयतां देशांत व्यापारवृद्धि घडवून आणावी असा कराराचा हेतु असला तरी आयात व निर्यात सालोसाल वाढत जाणें कठीण जातें असें वरील आंकड्यांवरून दिसतें. तथापि, व्यापार–वृद्धीच्या मार्गांतील अडचणी दूर करण्याचा उभयतां देशांचा विचार असल्यानें वरील आंकड्यांचा त्या दृष्टीनें उपयोग करून घेतां येईल.


आपणांस शक्य असेल
तेवढी रक्कम आपण
राष्ट्रीय नियोजन कर्जांत
गुंतविली आहे काय ?

तावडतोब गुंतवा.

लक्षांत ठेवा
हें कर्ज ता. १६ सप्टेंबर १९५४ रोजीं बंद होत आहे.

राष्ट्रीय नियोजन कर्जास
सढळपणें हातभार लावा

भारताच्या भविष्यांत पैसा गुंतवा

## ब्रिटन्स यूथ एंप्लॉयमेंट सर्व्हिस

### ( ब्रिटनमधील तरुणांस कामधंदा लावून देणाऱ्या संस्थेचें कार्य )

तरुणांना त्यांच्या आयुष्यक्रमाचा पुढील मार्ग चोखाळण्याच्या बाबतींत मदत करण्याकरितां ब्रिटनमध्यें एक संस्था आहे. तिचें नांव "ब्रिटन्स यूथ एम्प्लॉयमेंट सर्व्हिस" असें आहे. सदर संस्थेकडून झालेल्या कामासंबंधीं माहिती थोडक्यांत खालीं दिली आहे. त्यावरून, तरुणांना मार्गदर्शन करून त्यानंतर निरनिराळ्या व्यवसायांत पदार्पण करण्याकरितां कशा प्रकारें मदत केली जाते यासंबंधानें कल्पना येईल. ही माहिती फॉर्टनाइटली रिव्ह्यु ऑफ न्यूज ॲन्ड इव्हेंटस, फेब्रुवारी १९५४, या नियतकालिकावरून संक्षिप्त रूपांत खालीं दिली आहे.

सन १९५२ सालीं सुमारें ५ लक्षांवर ब्रिटिश मुलें व मुली मिळून आपला शालेय शिक्षणक्रम पुरा करून बाहेर पडलीं. यांपैकीं बरीचशी कलाकौशल्य व इतर निरनिराळ्या धंद्यांमध्यें उमेदवारीचें काम करण्यांत गुंतलीं गेलीं व कांहीं निरनिराळ्या प्रकारच्या कारकुनी पेशाकडे वळलीं. या मुलांची वयवारी अशी होती. प्रत्येक पांचांपैकीं चारांचें वय १५ वर्षांचें होतें व बाकीच्यांचें वय १६ ते १७ च्या दरम्यान होतें.

एकंदर आंकडेवारीचें निरिक्षण करितां दिसून आलें कीं मुलांमध्यें आपण पुढें यावें अशी तीव्र इच्छा दिसून आली. सर्वसाधारणपणें तीनांमधील एकजण धंद्याकडे वळलेला दिसून आला. २,६५,००० मुलांपैकीं १५ वर्षे वयाच्या ७६,००० व १६ ते १७ वर्षे वयाच्या १६,४०० मुलांनीं व्यापार कौशल्याचा अभ्यास करण्याचा मार्ग स्वीकारला. यापेक्षा जास्त वयाचीं सुमारें ३२० मुलें, धंदेवाईक शिक्षणामध्यें प्रावीण्य मिळविण्याकडे वळलीं.

सुमारें २,५०,००० मुली ज्या पहिल्यानेंच कामाकरितां बाहेर आल्या त्यांपैकीं फक्त १५,००० च निरनिराळ्या व्यवसायामध्यें उमेदवार या नात्यानें शिरल्या व ३,००० धंदेवाईक शिक्षणाचें प्रावीण्य मिळविण्याकडे गेल्या. ऑफिसमध्यें कारकुनीचें काम करण्याकरितां मुलांपेक्षा मुलींचा ओढा जास्त दिसून आला. साधारणपणें ४ मुलींपैकीं १ मुलगी व ११ मुलांपैकीं १ मुलगा कारकुनी धंद्याकडे गेलेलीं दिसून आलीं.

इंजिनिअरिंग, जहाजें बांधणें व कच्च्या मालापासून पक्का माल तयार करणें, वगैरेंमध्यें सर्वसाधारणपणें मुलें उमेदवार किंवा शिकाबू अशा पेशानें गेलीं. शेतीकडेहि बरेच वळले. मालाची विक्री, इमारती बांधणें, कंत्राटें घेणें, मालाची ने–आण करणें, खाणकाम, वगैरेंमध्यें शालेय शिक्षण संपवून आलेल्या मुलांचा भरणा दिसून आला. खनिज व खाणकामामध्येंहि शिरणाऱ्यांचें प्रमाण वाढलेलें दिसून आलें.

शालेय शिक्षण संपून बाहेर पडलेल्या १५ वर्षे वयाच्या मुलींच्या बाबतींत पहातां दुकानदारींतील पगारी नोकरीमध्यें शेंकडा ३३ टक्के प्रमाण दिसून आलें व १६ ते १७ वर्षे वयाच्या मुलींचें शेंकडा ४२ टक्के प्रमाण, सरकारी कचेऱ्या, सार्वजनिक संस्था व धंद्यामधील नोकऱ्याकडे गेलेल्या दिसून आल्या. उत्पादक धंद्यांमध्यें १५ वर्षे वयाच्या मुलींचें प्रमाण कमी झालेलें दिसून आलें. परंतु शेतकी व्यवसायामध्यें पडलेल्यांचें प्रमाण थोडें वाढलेलें दिसून आलें.

तरुणांनीं स्वतःला जें काम योग्य वाटतें तेंच करण्याचें ठरवून त्यामध्यें आपली बुद्धिमत्ता उपयोगांत आणणें हें फार महत्त्वाचें आहे. हें होण्याकरितां त्यांस उत्तम संधि देण्याचें कार्य सन १९४८ च्या कायद्यानें 'ब्रिटन्स यूथ एम्प्लायमेंट सर्व्हिस' या संस्थेमध्यें सुधारणा होऊन मिनिस्टर ऑफ लेबर यांजकडे या राष्ट्रकार्याची जबाबदारी देण्यांत आली, व त्यांना सल्लामसलत देण्याकरितां 'नॅशनल यूथ एम्प्लॉयमेंट कौन्सिल' व 'अॅडव्हायसरी कमेटीज ऑन यूथ एम्प्लायमेंट फॉर स्कॉटलंड ॲण्ड वेल्स' स्थापण्यांत आली.

नॅशनल यूथ कौन्सिल ही एक मोठी वजनदार संस्था असून हिच्या सभासदांमध्यें स्थानिक संस्थांचे प्रतिनिधी, शैक्षणिक कमेट्या, शिक्षक संस्था, कारखानदार व कामगार, असे असतात. ब्रिटनमधील ट्रेड युनियन कॉंग्रेसचें जनरल कौन्सिल या संस्थेमध्यें फार जागरूकतेनें लक्ष घालतें व सदर कौन्सिलमधील तीन सभासद या नॅशनल यूथ कौन्सिलवर काम करतात.


कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

पृ. सं. १६८ ★ किंमत २॥ रु.

"आपल्या लेखांत दैनंदिन जीवनांतील साध्या साध्या गोष्टी घेऊन, त्यांतून महाराष्ट्राचे एक प्रसिद्ध विचारवंत लेखक श्री. श्री. वा. काळे ह्यांनीं सुखी जीवनाची किल्लीच जणुं काय प्रत्येकाच्या हातांत दिली आहे."

ग. वा. मावळंकर
लोकसभेचे अध्यक्ष

("कण आणि क्षण" च्या गुजराती आवृत्तीच्या प्रस्तावनेंतील उतारा.)

किर्लोस्कर पॉवरवर चालणारा 'शरद' चरक

हा चरक चालविण्यास ८।१० हा. पा. एंजिन लागते. दरेक तासास १२०० ते १५०० पौंड ऊंस गाळला जातो. याशिवाय बैलावर चालणारे कमाल, करामत व पॉवरवर चालणारे




कोयना, वसंत, वगैरे चरक आहेत. पसंतीप्रमाणें निवड करा.

—सविस्तर माहितीसाठीं लिहा—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.

युथ एम्प्लॉयमेंट सर्व्हिस या संस्थेचा जानेवारी १९५० ते जानेवारी १९५३ चा रिपोर्ट प्रसिद्ध झालेला आहे. त्यावरून या तीन वर्षांमध्यें शालेय शिक्षण संपविलेल्या सुमारें १५ लक्षांचें मार्गदर्शन या संस्थेकडून केलें गेलें व यांपैकीं साडेतेरा लक्षांना काम मिळवून देण्यांत आलें. यांपैकी निम्म्या लोकांस या संस्थेच्या मार्गदर्शनामुळेंच केवळ नोकरीत प्रवेश मिळूं शकला. या संस्थेमुळेंच केवळ बाहेर पडलेल्या मुलांमुलींस आपआपल्या आवडीप्रमाणें निरनिराळ्या व्यवसायांमध्यें प्रवेश मिळण्याचें क्षेत्र विस्तृत झालेलें आहे. या रिपोर्टावरून असेंहि दिसून येतें कीं फारच थोडीं मुलें आपले वडील करीत असलेल्या धंद्याकडे वळतात.

सर्वांना कामधंदा देणें हें आपल्या संस्थेचें ध्येय आहे ह्याची जाणीव नॅशनल यूथ कौन्सिल या संस्थेस असल्यामुळें शारीरिक व्यंग असलेल्या तरुणांसाहि त्यांना अनुरूप असें काम मिळवून देणें हेंहि आपल्याकडे येतें असें समजलें जातें व व्यंग असलेली प्रत्येक व्यक्ति एक स्वतंत्र प्रश्नच यूथ एम्प्लॉयमेंट ऑफिसरपुढें निर्माण होतो असें रिपोर्टांत म्हटलें आहे. प्रत्येक सर्वसाधारण प्रकारच्या तरुणाच्या बाबतींत हा प्रश्न असतोच, परंतु व्यंग असलेल्या तरुणाच्या काम करण्याच्या मर्यादित कुवतीचा बरोबर अंदाज करून त्यास योग्य असें स्थानिक मार्गांतच काम शोधून काढून त्या बाबतींत सल्ला देणें फारच कुशलतेचें काम होय.

पुष्कळशा शारीरिक व्यंगांबरोबर, भावना प्रधानता वगैरे अडचणींमुळें यूथ एम्प्लॉयमेंट ऑफिसरचें काम अधिकच बिकट होतें. अर्थात् या अधिकाऱ्यांच्या कामाची परीक्षा प्रत्यक्ष दिसून येणाऱ्या परिणामावरूनच ठरविली जाते.

शारीरिक व्यंगें निरनिराळ्या प्रकारचीं असतात व प्रत्येकाचा प्रश्न वेगवेगळा असतो. उदाहरणार्थ, बहिरेपणा असलेल्यास आपण इतरांपासून दूर आहों असें वाटतें व त्यामुळें त्याच्यामध्यें एकप्रकारची मानसिक अस्वस्थता निर्माण होते. अशा लोकांस नोकरी न मिळण्यामुळें होणाऱ्या विफलतेपासून बचावण्याचे प्रयत्न एकसारखे करावे लागतात.

या बाबतींत वरील सारखीं व्यंगें असणाऱ्यांच्या बऱ्याकरितां प्रयत्न करणाऱ्या खाजगी संस्थांच्या कामाबद्दलहि रिपोर्टामध्यें फारच प्रशंसा केलेली आहे. मानसिक व शारीरिक व्यंग असलेल्या तरुणाची कोणकोणत्या उद्योगधंद्यांत सोय करतां येईल या संबंधानें नॅशनल यूथ कौन्सिल ही संस्था संशोधन करीत असून, याबाबतींत यूथ एम्प्लॉयमेंट ऑफिसरांकडून नेहमींच्या ठरलेल्या धंद्याव्यतिरिक्त इतर कोणत्या वेगवेगळ्या धंद्यांमध्यें व्यंग असलेल्यास काम देतां येईल, याबद्दलहि माहिती मिळविण्यांत येते.

वरीलप्रमाणें माहिती मिळविण्यामध्यें सन १९३२ ते १९४२ या दहा वर्षांत ग्रामर स्कूलमधील शिक्षण संपलेली २०० अंधमुलें कोणकोणते व्यवसाय करीत आहेत या संबंधांत विस्तृत प्रमाणावर निरीक्षण व अभ्यास चालू आहे. याअभ्यासावरून अंधांकरितां अधिक प्रमाणांत धंदा मिळण्यास कोठें कोठें वाव आहे हें समजून येऊन शिवाय या संशोधनाचा फायदा दुसरीं अनेक प्रकारचीं जीं शारीरिक व्यंगें आहेत व ज्याच्यासंबंधी फारच थोडी माहिती सध्यां उपलब्ध आहे, अशांच्या बाबतींतहि जास्त संशोधन करण्यासहि उपयुक्त होईल.

बा. कृ. कोमेकर

## दि सेंट्रल म्यूच्युअल लाइफ इन्शुअरन्स कं. लि.

सदर कंपनीचा १९५३ सालअखेरचा अहवाल, जमाखर्चाचे तक्ते व ताळेबंद आमचेकडे परीक्षणार्थ नुकतेच आले आहेत. अहवालाचे सालीं कंपनीनें एकूण ५,०३,७५० रुपयांचीं विमापत्रें दिलीं. हप्त्याच्या व व्याजाच्या रूपानें जमा झालेली रक्कम रु. १,८८,२२१ इतकी होती व खर्चाचा आंकडा फक्त रु. ३९,६५० इतकाच होता. विमाकायद्यानें घालून दिलेल्या खर्चाच्या कमाल मर्यादेपेक्षा हें प्रमाण खूपच कमी असून, कंपनीच्या सचोटीच्या व शास्त्रशुद्ध व्यवहाराचें तेंच गमक आहे.

खर्चाप्रमाणेंच, कंपनीचे पैसे गुंतविण्याचें धोरणहि फार सावधगिरीचें दिसतें. कंपनीनें मिळविलेला सरासरी व्याजाचा दर व कंपनीच्या एकंदर जिंदगीचा तपशील, याकडे नजर टाकली असतां या गोष्टीची चटकन् खात्री पटते.

कंपनीनें अहवालाचे सालीं एकूण १८,१६५ रुपयांचे क्लेम्स दिले. कंपनी क्लेम्सची रक्कम देतांना बिलकूल विलंब लावीत नाहीं.

कंपनीनें पुण्यास बंडगार्डनसमोर मोठी जागा घेतली असून त्यांत, पाणी, वीज, रस्ते, ड्रेनेज, वगैरे सोयींनीं युक्त व आटोपशीर असे प्लॉटस पाडले आहेत. सदर प्लॉटसची विक्री झपाट्यानें चालू आहे.

कंपनीचें दुसरें मूल्यमापन ३१-१२-५२ अखेरच्या चार वर्षांचें झालें. अत्यंत काटेकोरपणें मूल्यमापन करूनसुद्धां कंपनीला फायदा होऊन त्यांतून, हयातीच्या व हयातीनंतरच्या विम्यांना दरसाल दर हजारीं अनुक्रमें रु. ७। व रु. ९। याप्रमाणें बोनस जाहीर करण्यांत आला.

कंपनीचा वरील अहवाल १२-८-१९५४ रोजीं भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेंत मंजूर करण्यांत आला. त्याप्रसंगीं कंपनीचे अध्यक्ष श्री. फॉजलभाय यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत पुढील गोष्टींचा प्रामुख्यानें उल्लेख केला. कायद्यानें विमा कंपन्यांच्या खर्चावर जरी नियंत्रणें घातलीं असलीं तरी, प्रथमपासूनच सावधगिरीचें धोरण अवलंबिलें असल्यानें त्याची झळ या कंपनीला लागूं शकणार नाहीं. विमा कंपन्यांना, विशेषतः म्यूच्युअल कंपन्यांना, प्राप्तीवरील करांचे बाबतींत सूट मिळण्याची आवश्यकता त्यांनीं आग्रहानें प्रतिपादली. तसेंच, कांहीं मोठ्या कंपन्यांनीं प्रीमियमचे दर कमी करून, देशांतील विमाव्यवसायांत जी अनैसर्गिक स्पर्धा उत्पन्न केली आहे, त्याबद्दल त्यांनीं आपल्या भाषणांत तीव्र नापसंती व्यक्त केली व सरकारनें आणि इन्शुअरन्सच्या एक्झिक्युटिव्ह कमिटीनें याबाबत जें धोरण अवलंबिलें आहे, त्याबद्दल असमाधान व्यक्त केलें, व हें गुळमुळीत धोरण, देशांतील विम्याच्या धंद्यास खात्रीनें पोषक ठरणार नाहीं, असा गंभीर इषारा देऊन त्यांनीं भाषण संपविलें.

वरील अहवालावरून असें दिसून येईल कीं, कंपनीची प्रगति समाधानकारकपणें होत असून, त्याचें बरेचसें श्रेय कंपनीचे उत्साही मॅनेजिंग डायरेक्टर श्री. शंकरराव आगाशे यांनाच देणें योग्य आहे. आम्ही कंपनीला सुयश चिंतितों.

**तुंगभद्रा नदीवरील धरणाचा फायदा**—तुंगभद्रा नदीवर बांधण्यांत आलेल्या धरणाच्या पाण्यानें आंध्र, म्हैसूर आणि हैदराबाद राज्यांतील जमिनींना पाण्याचा पुरवठा होणार आहे. आंध्र राज्यांत १,५९,००० एकर जमिनीला, म्हैसूर राज्यांत ९,००० एकर जमिनीला आणि हैदराबाद राज्यांत २४ लाख एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होऊं लागेल.

## पंचवार्षिक योजनेचें सर्वांगीण महत्त्व

लेखक:—श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम.

पंचवार्षिक योजनेची प्रगति सरकारनें चित्रपट, वर्तमानपत्रें आणि पुस्तिकाद्वारें जनतेपुढें मांडलेली आहे. तरीसुद्धां विशेषत: नागरी जनतेमध्यें अजूनहि उदासीनता दिसून येत आहे. नुकतेंच आपले प्रधानमंत्री श्री. पंडित जवाहरलाल नेहरू यांना या उदासीनतेबद्दल घृणा उत्पन्न होवून जनतेला 'आराम हराम है' अशी नवी घोषणा सुपूर्त करावी लागली, याचें इंगित हेंच आहे. मला असें वाटतें कीं, सरकारनें आपली विनयशील प्रसिद्धि पराङ्मुखता थोडी बाजूला ठेवून योजनेची प्रसिद्धि जास्त परिणामकारक रीतीनें करावयास हवी. आपलें शांतियुक्त स्वातंत्र्ययुद्ध ज्या हिरीरीनें लढलें गेलें ती हिरीरी स्वातंत्र्य या साधनाबद्दल जेवढी दाखवली गेली त्यापेक्षा 'उन्नति' या साध्याबद्दल कितीतरी जास्त जनतेला वाटावयास हवी.

या योजनेच्या तपशीलांत जरी फारसें आपण खोलवर गेलों नाहीं आणि निव्वळ तिचा दृष्टीकोन काय आहे हें पाहिलें तरी सुद्धां आपल्याला तिचें सर्वांगिण महत्त्व ताबडतोब पटेल. योजना सर्वांगिण आहे म्हणजे आपल्या मूलभूत गरजा, अन्न, पाणी, कपडा आणि घर यापुरतीच योजना नसून या प्राथमिक गरजा सफल झाल्यानंतर तदनुषंगानें वाढणाऱ्या आपल्या सांस्कृतिक गरजांचाहि विचार व त्यांच्या सफलतेचा मार्ग तिनें दाखवून देऊन तो कसा साध्य करावयाचा याचें पूर्ण विवेचन केलेलें आहे. म्हणून बुद्धिप्रधान माणसालासुद्धां एकंदर योजनेचें स्वरूप विशेष स्वागतार्ह वाटतें.

या योजनेचे दोन मुख्य हेतू आहेत. एक लोकांच्या रहाणीचें मान सुधारणें आणि दुसरा सामाजिक न्याय मिळवून देणें. हे हेतू आपल्या प्रत्येकाचेच आहेत. हें साध्य करण्याकरतां नवी अर्थ-व्यवस्था कशा प्रकारची असावी हें ओघानें आलेंच. स्वातंत्र्यपूर्व कालांत आपली झालेली बहुतेक आर्थिक प्रगति बव्हंशी खाजगी प्रयत्नानें झालेली आहे. या कालांत उत्पादनावर सरकारचें खास कुठलेंच नियंत्रण नव्हतें. आणि ज्या वस्तूंच्या उत्पादनांत जास्तींत जास्त नफा दिसेल अशाच वस्तू कारखानदार उत्पादन करण्याच्या मागें असत. या पद्धतींत साहजिकच सामाजिक विषमता गोवली गेलेली आहे. म्हणजे उत्पादन—साधनें ज्यांच्या हातीं, ते जास्तींत जास्त श्रीमंत; तर श्रम करणारा अर्धपोटी, आजारी आणि जीवनाची अनिश्चिति भोगणारा. तेव्हां, नवी अर्थव्यवस्था लोकशाही म्हणजे सर्व जनतेच्या सारख्या कल्याणाकरतां अशी झाली पाहिजे. म्हणजे, जनतेचे प्रतिनिधि सरकार आणि जनतेचें स्वयंस्फूर्त सहकार्य यांनीं तिची घडण बनली गेली पाहिजे. नियोजनसमितीनें म्हणून लोकशाही व्यवस्थेला प्राधान्य देऊन, त्याबरोबरच अजून पुष्कळ कालपर्यंत खाजगी प्रयत्नांची जरूर रहाणाराच हें ओळखून खाजगी प्रयत्न करणारांना विश्वासांत घेऊन व त्यांना सहकार्याची देवाण—घेवाण करण्याला वाव ठेवून योजनेची उभारणी केलेली आहे.

योजनेमध्यें सरकारनें श्रमविभागणीचें तत्त्व शक्य तितकें अंमलांत आणलेलें आहे. सरकारच्या हातीं असलेल्या सामग्रीचा उपयोग ज्या कार्याचें स्वरूप प्रचंड आहे म्हणजे शेती, धरणें आणि कालवे, विद्युत्—उत्पादन आणि जनतेचें आरोग्य, शिक्षण, या कार्यांत खर्च होणार असून बाकीच्या क्षेत्रांत खाजगी उद्योग-धंद्यांना प्रसंगविशेषीं स्वत:चें सहकार्य देऊन वाव ठेवलेला आहे.

आतां योजनेस हात घालतांना कोणत्या कार्यास प्राधान्य द्यावयाचें ? नुसते तांतडीच्या गरजा आणि अन्न येवढ्यावरच लक्ष केंद्रित केलें तर आजची गरज जरी भागली तरी भावी सुविस्तृत अर्थव्यवस्थेचा पाया मग आतां घालतां येणार नाहीं. तेव्हां प्राप्तकाल आणि भविष्यकाल या दोघांचाहि समन्वय योजनेमध्यें केला गेलेला आहे ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.

यानंतर एकंदर योजनेचें स्वरूप, आंकड्यांत फार न शिरतां, पाहणें जरूर आहे. योजनेचें उद्दिष्ट साध्य करण्याकरतां या पहिल्या पंचवार्षिक योजनेंत सरकारनें एकूण दोन हजार एकुणसत्तर कोटी रुपये भांडवल घालण्याचें ठरविलें आहे. त्यायोगें १९५०–५१ सालीं देशाचें जें उत्पन्न सुमारें नऊ हजार कोट रुपये होतें, तें अंतीं सुमारें दहा हजार कोटींपर्यंत वाढूं शकेल. प्रथम प्रगति सावकाशच राहणार आहे त्याला उपाय नाहीं. त्याचा वचपा पुढील दशवार्षिक योजनेमध्यें आपोआप निघणार आहे.

या भांडवली खर्चाची विभागणी शेती व ग्रामसुधारणा, धरणें, कालवे, पाटबंधारे, व वीज आणि इतर शक्तिउत्पादन, वाहतूक व दळणवळण, कारखाने, सामाजिक कार्य, निर्वासितांची पुनर्वसाहत व इतर यामध्यें प्रतवारीनें व प्रमाणांत केलेली आहे, व त्याला अनुसरून सरकारजवळील आणि खाजगी उत्पादनसामग्री त्या त्या प्रमाणांत वाढणार आहे. तसेच खर्चाची जबाबदारी सर्व प्रांतिक राज्यांवर योग्यरीतीनें वांटून देण्यांत आलेली आहे.

इतका प्रचंड भांडवली खर्च करतांना तितका पैसा कसा उभारावयाचा याचाहि विचार नियोजन समितीनें फार व्यवहार्य रीतीनें केलेला आहे, व तोंडमिळवणी करून दाखविलेली आहे. मुख्य भर सार्वजनिक कमिजास्त लांब मुदतीचीं कर्जें, अल्प-बचतीच्या योजना, महसुलांतील वाढ, रेल्वेचा नफा, यावर, तसेंच स्थावरावरील कर, विक्री कर, सुधराई कर (Betterment), पाणीपट्टी, मोटारी आणि करमणुकीवरील कर आणि बाहेरील देशांकडून मिळणारी मदत व शिल्लक असलेली पौंडी ठेव यांतून हा खर्च भागविला जाणार आहे.

वर ज्या खर्चाच्या प्रमुख बाबीं सांगितल्या त्या प्रत्येकाचा थोडक्यांत विचार करूं.

प्रथमत: झपाट्यानें लोकसंख्या वाढत असलेला व वाढत्या अन्नाची जरूर असलेला आपला देश शेतकीप्रधान आहे म्हणून योजनेनें शेतीला अग्रहक्क दिलेला आहे. शेतीची सर्वांगीण सुधारणा करतांना जमिनीच्या मालकी हक्काबद्दल दिग्दर्शन, तुकड्यांचें एकीकरण, सामुदायिक शेतीची शक्यता यांचा विचार करून शेतीच्या सर्व शाखांबद्दल योजनेनें दिग्दर्शन केलेलें आहे. या प्रयत्नांत सहकारी तत्त्वावर जास्त भर देण्यांत आलेला आहे. शेतकऱ्याला जरूर असणाऱ्या अल्प, मध्य व लांब मुदतींच्या भांडवली कर्जाची सोय सहकारी सोसायट्या व नियंत्रित सावकारवर्ग यांच्याकडून व्हावयाची आहे. शेतीचीं प्रमुख अंगें, जमिनीचा खतें वापरून कस वाढविणें, धूप थोपवणें, यांत्रिक नांगरट, संशोधनसुलभ बीं-बियाणें व अवजारें, पावसाच्या लहरीवर न अवलंबतां धरणांच्या कालव्यांच्या पाण्याचा योग्य उपयोग, अन्नधान्य पिकें व रोकड देणारीं पिकें, कारखान्यांच्या कच्च्या मालाची तरतूद, यांचा समन्वय शेतमजुरांना योग्य वेतनावर काम आणि बेकार वेळांत घरगुती धंदे चालविण्यास भांडवल व उत्तेजन, उत्पादित मालाची साठवण, नियंत्रित बाजारांतून सहकारी विक्री, अनावश्यक दलालांचें उच्चाटण, इत्यादि शेतकीविषयक सर्व अंगो-पांगांचा परामर्ष घेऊन योजनासमितीनें सुधारणेचा मर्याद कार्यक्रम आंखलेला आहे. हा संकल्पित खर्च शेतीवर झाल्यानंतर

जनतेच्या पदरांत काय जास्त पडणार आहे याचा अंदाज समितीनें केलेला आहे. उदाहरणार्थ, १९५१ सालच्या उत्पादनाच्या मानानें, अन्नधान्यें सुमारें १२–१४ टक्के, कपास बेचाळीस टक्के, ताग त्रेसष्ट, ऊंस बारा व तेलबिया आठ टक्के इतकी वाढ योजनेच्या शेवटीं जनतेच्या पदरांत पडणार आहे. शेतीला धरून असणारे इतर व्यवसाय, जनावरांची जोपासना व त्यांचें आरोग्यरक्षण, दुधदुभतें, भाजीपाला व फळफळावळ यांचें अधिक उत्पादन, अधिक लोकरीची निपज, मृत जनावरांच्या हाडांचा खतादि उपयोग, कातडीं कमावणें व त्यांचा निर्यात व्यापार, जंगलांचें व त्यांतील जनावरांचें रक्षण व वाढ, जनतेची जळणाची सोय, यांची सर्व दखलगिरी योजनेंत घेण्यांत आलेली आहे. मासेमारीच्याहि धंद्याचा समावेश शेतींत करण्यांत आलेला आहे.

देशांतील प्रमुख नद्या सिंधु, गंगा, कृष्णा, गोदावरी, महानदी, कावेरी, तुंगभद्रा, नर्मदा व तापी, यांच्या पाण्याचा उपयोग शेतांकडे करून घेण्यांत येत आहे व चालू धरणांचीं कामें पूर्ण झाल्यावर सुमारें एक कोटी एकुणसत्तर लक्ष एकर नव्यानें भिजतील व धरणांपासून आणखी एक कोटी सेहेचाळीस लाख किलोवॅट वीज उपलब्ध होईल. धरणांपैकीं भाकरा पूर्ण झालेलें आहे व हिराकूद, तुंगभद्रा पुरीं होण्याच्या मार्गावर आहेत. हैडेल प्रॉजेक्टस् म्हणून कोसी, कोयना, चंबळ आणि रिहंद यांच्या प्राथमिक कामास सुरुवात झाली आहे.

ग्रामसुधारणेच्या कार्यक्रमांत ग्रामीण जनतेनेंच जास्तींत जास्त भाग घेणेंचा आहे. मात्र योजनेनें एक महत्त्वाची व व्यवहारपूर्ण गोष्ट केली आहे ती ही कीं, शेपन्नास सरकारी हुकुमांनीं जी ग्रामीण जनता गोंधळांत पडते व कार्य होऊं शकत नाहीं त्याऐवजीं एक प्रातिनिधिक अधिकारी नेमण्यांत घेऊन त्याच्यातर्फे सरकार व ग्रामीण जनता यांचा दुवा सांधण्यांत येऊन ग्रामसुधारणेच्या कार्यास चालना देण्यांत येणार आहे. ग्रामीण जनतेला बेकारीच्या काळांत धनोत्पादक धंदे सुचविण्यांत आलेले असून त्यांना भांडवल पुरवण्याचीहि तरतूद करण्यांत आली आहे. यांत प्रामुख्यानें तेल गाळणें, साबण, तांदूळ सडण, ताडगूळ, गूळ व खांडसरी साखर, कातडीं कमावणें, घोंगड्या विणणें, सुडाचा कागद, मधमाशा पाळणें, काड्याच्या पेट्या, खादी आणि चव्हाट विणणें यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल.

यानंतर आपण कारखानदारीकडे वळूं. ही आजवर खाजगी प्रयत्नांनीं चाललेली असून पुढेंहि तशीच चालणार असल्यामुळें योजनेमध्यें याबाबतचें धोरण, 'नियंत्रण व मदत' या दोन शब्दांत व्यक्त केलें आहे. नियंत्रणाची जरूरी, टंचाई जनतेच्या गरजांपासून वारेमाप फायदा, गैरव्यवस्था, मजुरांची पिळवणूक आणि देशाच्या संरक्षणाची जरूरी, यांतून होत असते. पण नियंत्रण आवश्यक असलें तरी प्रामाणिकपणें मागणीपुरवठा व बाजारभाव यांची जोखम पत्करून जे उद्योग चालत आले आहेत, अनेक वर्षे नुकसान सोसून आतांच नफा पाहूं लागले आहेत, अशांना तें केव्हांहि जाचक होणार नाहीं याबद्दल दक्षता घेण्यांत आली पाहिजे. कांहीं समाजकंटक नेहमींच राहाणार पण सुक्याबरोबर ओलेंही जाळलें जातें असा अनुभव येतो. दुसरें असें कीं, जसें सुबत्तेमुळें अन्नधान्याचें नियंत्रण उठविण्यांत आलें तसें इतर बाबतींतही करतां येऊन बाजारभावच कारखानदारांना योग्य ते वळण लावतील.

उद्योगधंद्यांना मूलभूत मदत संशोधन ही आहे व तीस अनुसरून सरकारनें पदार्थविज्ञान, रसायन, इत्यादि मोठ्या प्रयोगशाळा स्थापन केलेल्या आहेत. कारखानदारींत एकूण एकशेत्र्याहत्तर कोटी रुपये नवीन भांडवल घालण्यांत येणार आहे. त्याबाबतचे आंकडे देण्याची इथें जरूरी नाहीं.

कारखान्यांतील मजूर–मालक तंटे व वाद संप न करतां त्रयस्थ व लवादातर्फे सोडविले जावेत यावर योजनेंत भर देण्यांत आला आहे.

आर्थिक व्यवहारांत दळणवळण व वाहतूक यांना आतिशयच महत्त्व आहे. त्यावर चारशेसत्याण्णव कोट रुपये खर्च व्हावयाचे आहेत. वाहतूक व दळणवळण सुसूत्र, प्रमाणबद्ध, पूरक व खेड्यांना शहरांच्या जवळ आणणारीं झालीं पाहिजेत. रेल्वे, सडका, जहाज वहातूक, नागरी विमान वाहतूक, छोटीं–मोठीं बंदरें, अंतर्गत जलवाहतूक, पोस्ट, तार खातें, व टेलिफोन, आकाशवाणी, परदेशीं दळणवळण व हवामान खातें, या खर्चाच्या बाबी आहेत.

यानंतर योजनेंत समाजाहितसंवर्धनाच्या कार्यावर तीनशेचाळीस कोट रुपये खर्च होणार आहेत. समाजाचें सर्वांगीण कल्याण होण्यास हातभार लावतील अशा सर्व कार्यांचा यांत समावेश होतो. शिक्षण, आरोग्य, मागासलेल्यांची व दलितांची, तसेंच वन्यजातींची उन्नति, स्त्रिया, मुलें, बहिरे, मुके, अपंग व भिकारी यांची कुचंबणा होऊं नये व त्यांना माणसें म्हणून जगतां यावें हा या खर्चाचा महाउदार हेतु आहे. शिक्षणसंवर्धनांत योजनेनें प्राथमिक व दुय्यम शिक्षण, विद्यालयीन पदवी शिक्षण, समाजशिक्षण, पांढरपेशे व तांत्रिक धंद्यांचें शिक्षण, स्त्रियांचें शिक्षण, शिक्षक व त्यांचे पगार, विद्यार्थ्यांत शारीरिक कामाची आवड उत्पन्न करणें व त्यांच्याकडून सामाजिक कार्य करून घेणें, इत्यादि सर्व गोष्टींचा विचार केलेला आहे. आरोग्याच्या बाबतींत निकृष्ट आरोग्याच्या कारणांचें संशोधन, दर चाळीस हजार लोकवस्तीच्या गरजा भागवूं शकतील अशीं आरोग्य–पथकें, इस्पितळें, डॉक्टर्स, नर्सेस, हेल्थव्हिजिटर्स, सुईणी, दंत व नेत्रवैद्य, ॲलोपाथीबरोबरच आयुर्वेद, होमिओपाथी, युनानी पद्धति यांना उत्तेजन व अधिकृत उपयोग, या सर्वांवर योग्य तो खर्च होऊन जनतेचें आरोग्य सुधारून आयुर्मान वाढणार आहे. कुटुंबनियोजनाला सुद्धा दिशा दाखविण्यांत येत आहे. वाढत्या लोकसंख्येला पुरेशी घरें बांधण्याचें काम नॅशनल हौसिंग बोर्डातर्फे होणार आहे. जनतेला संघटनेनें मनोरंजन व शरीरस्वास्थ्यविषयक शिक्षण व संस्कृति–विकास कार्य व पंचायतींतर्फे कारभार याकरतां येण्यासारख्या आहेत. समाज केंद्रें स्थापून त्यांतून नेते निपजतील असा योजनेला विश्वास वाटतो.

शेवटीं योजनेमध्यें निर्वासितांच्या पुनर्वस्तीकडे लक्ष पुरवलें असून त्यावर पंच्याऐंशी कोट रुपये खर्च होणार आहेत.

याप्रमाणें ही योजना सर्वंकष व सर्वगामी आहे. राहणीचें मान सुधारण्याकरतां जें जें करावें लागणार आहे त्याचा अगदीं बारीक विचार करण्यांत आला असून कुठलीही किरकोळ बाब विचारांतून व तपासणींतून सुटलेली नाहीं, हें मी आतांपर्यंत निर्देशिलेल्या बाबींवरून लक्षांत येईल. तेव्हां ही सर्वांगीण योजना यशस्वी करण्याकरतां सरकार व आपले नेते निश्चयपूर्वक आपल्याच करतां झटत आहेत याबद्दल विश्वास प्रत्येकानें बाळगून मनांतला अविश्वास, शंका व आळस झाडून टाकून कार्यप्रवृत्त झालें पाहिजे.

(पुणें रेडिओ केंद्रावरून ध्वनिक्षेपित केलेलें भाषण, अनुज्ञेनें उद्धृत)

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.